| | |
|---|---|
| | फौ. कि. अर्ज क्र. ३०/२०२६<br>तेजस –वि– शासन<br>एम.एच.वाय.ए.क्र. १३–०००२८३–२०२६ |

<u>निशाणी क्रमांक ०१ वर आदेश</u>

[**दि.०६/०४/२०२६ रोजी** पारित]

१) प्रस्तुतचा अर्ज अर्जदार नामे– तेजस राजू राठोड यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ५०३ अन्वये जप्त मुद्देमालाचा अंतरिम ताबा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. त्यामध्ये अर्जदार यांनी असे नमूद केले आहे की, त्यांचे बजाज पल्सर अल्टो, काळ्या रंगाची दुचाकी वाहण ज्याचा नोंदनी क्र.एम.एच.–२९/बी.झेड/४३६१, चेसिस क्र. एम.डी.२बी.६४बी.एक्स.९पी.डब्लु. एम.०५२१८ व इंजिन क्र. डी.एच.एक्स.डब्लु.पी.एम.६३४२८ हे वाहन गुन्हा रजिष्टर क्रमांक ७८०/२०२५, दिग्रस, पोलीस स्टेशन मध्ये जप्त करण्यात आले आहे. सदरील वाहनाची अर्जदारास दैनंदिन कामकाजा करीता नेहमी गरज पडते व अर्जदारास त्याची अत्यंत आवश्यकता आहे. म्हणून प्रस्तुत वाहनाचा अंतरिम ताबा मिळण्यासाठी अर्जदार यांनी प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे.

२) प्रस्तुत अर्जास विद्वान सहायक सरकारी अभियोक्ता यांनी नि.क्र. ०७ अन्वये म्हणने दाखल करुण प्ररणाचा तपास प्राथमीक पातळीवर असुन सदर प्रकरणातीत जप्त मुद्देमाल अर्जदारास हस्तांतरित केल्यास त्याचे स्वरुप व मालकी बदलण्याची दाट शक्यता असल्याकारणाने अर्जदारास सदर वाहण परत देऊ नये अशी विनंती केली. तसेच तपास अधिकारी यांनी त्यांचे म्हणणे नि. क्र. ०६ अन्वये दाखल करुन, त्यामध्ये त्यांनी न्यायालयाने योग्य तो आदेश होण्याची विनंती केली आहे.

३) प्रस्तुतचा अर्ज, त्यावरील लेखी खुलासा व अभिलेखावरील दस्तऐवजांचे अवलोकन केले. तसेच अर्जदाराच्या विद्वान वकीलांचा व सरकारी

विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत अर्जाच्या समर्थनार्थ अर्जदार यांनी निशाणी क्रमांक ३ च्या दस्त यादीसोबत अर्जदाराच्या आधार ओळखपत्राची पडताळीत प्रत व जप्त वाहणाच्या आर.सी.बुकची पडताळीत प्रत व एफ.आय.आर ची प्रत तसेच सदरील वाहण हे अर्जदार नामे– तेजस राजू राठोड यांच्या नावे आहे. त्यावरुन सदरील वाहन हे अर्जदार यांच्या कायदेशीर ताब्यात व कब्ज्यात असल्याचे प्रथमदर्शी दिसून येते. त्यामुळे प्रस्तूत अर्जात नमुद केलेल्या मोटार सायकल बाबत गुणवत्तेवर आदेश पारीत करणे आवश्यक आहे.

४) माननीय सर्वोच्च न्यायालय, यांनी **<u>सुंदरभाई अंबालाल देसाई –वि.– स्टेट ऑफ गुजरात, २००२, व्हॉल्युम १०, एस.सी.सी. २८३</u>** यामध्ये असे नमूद केले आहे की, *'' कोणत्याही गुन्ह्यातील जप्त मुद्देमालाची आवश्यकता नसल्यास, सदरील मुद्देमाल पोलीस स्टेशन अथवा न्यायालयात प्रलंबित ठेवण्यात येवू नये. त्याबाबत विना विलंब कायदेशीर आदेश पारित केला पाहिजे.''* त्यामुळे सदरील अंतरिम आदेश पारित करताना, वर नमूद माननीय न्यायालय, यांच्या निर्देशाचे पालन करणे आवश्यक आहे.

५) सदरील जप्त मुद्देमाल हस्तातंरणाबाबत सहायक सरकारी अभियोक्ता तसेच तपासी अम्मलदार यांनी विरोध दर्शविलेला असला तरी, गुन्ह्याचे स्वरुप व जप्त मुद्देमालाचा पुराव्याच्या दृष्टीने महत्व व अर्जदाराची गरज या सर्व बाबींचा विचार केला असता, जप्त मुद्देमालाचा अंतरिम ताबा योग्य त्या अटींसह अर्जदारास हस्तांतरीत करणे प्रथमदर्शी योग्य वाटते.

## // <u>आ दे श //</u>

१) प्रस्तुत अर्ज भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ५०३ अन्वये मंजूर करण्यात येत आहे.

२) प्रस्तुत गुन्ह्यातील तपास अधिकारी, पोलीस स्टेशन, दिग्रस यांना आदेशीत करण्यात येते की, खालील बाबींची पुर्तता झाल्यानंतर व नमूद अटींसह, गुन्हा रजिष्टर क्रमांक ७८०/२०२५ मधील जप्त बजाज पल्सर अल्टो, काळ्या रंगाची दुचाकी वाहण ज्याचा नोंदनी क्र.एम.एच.–२९/बी.झेड/४३६१, चेसिस क्र. एम.डी.२बी.६४ बी.एक्स.९पी.डब्लु.एम.०५२१८ व इंजिन क्र. डी.एच.एक्स. डब्लु.पी.एम.६३४२८ ह्या वाहनाचा अंतरिम ताबा अर्जदार नामे– तेजस राजू राठोड यांना द्यावा.

**अ)** अर्जदार यांनी रक्कम रुपये १,५०,०००/– (अक्षरी दिड लाख रुपये) चे क्षतीपुर्ती बंधपत्र करुन द्यावे.

**ब)** तपास अधिकारी यांनी सदरील वाहन हस्तांतरणाचा विस्तृत पंचनामा करावा. तसेच सदरील वाहनाच्या सर्व बाजू दिसतील असे फोटो घेण्यात यावे.

**क)** अर्जदार यांनी न्यायालयीन परवानगी शिवाय सदरील वाहनाच्या विक्री तसेच त्यामध्ये कुठलाही बदल करु नये.

**ड)** सदरील न्यायालयास जेव्हा आवश्यक वाटेल, तेव्हा अर्जदार यांनी सदर वाहन न्यायालयात हजर करावे.

**इ)** सदर फोटोचा खर्च अर्जदार यांनी करावा.

**ई)** अर्जदाराचे सदर क्षतीपुर्ती बंधपत्र, मुद्देमाल हस्तातंरण पंचनामा व त्याबाबतचे फोटो तपास अधिकारी यांनी सदर गुन्ह्याच्या अंतिम अहवाल/दोषारोप पत्र सोबत न्यायालयात दाखल करावे.

SAKHARE MANISHA BALAJI
Digitally signed by SAKHARE MANISHA BALAJI
Date: 2026.04.06 17:59:33 +0530

ठिकाण :– दिग्रस
दिनांक :– ०६/०४/२०२६

**(म. बा. साखरे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्रमांक–२, दिग्रस.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file are same as per original.

| | |
|---|---|
| Name of Stenographer | S.B. Chilkewar |
| Name of the Court | Smt. M. B. Sakhare |
| | J.M.F.C. (Court No. 2), Digras. |
| Date of decision | 06.04.2026 |
| Order Signed by P.O. on | 06.04.2026 |
| Order uploaded on | 06.04.2026 |